चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
३१ जुलै, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

दिनांक २७/०७/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक रामनगर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम चारचाकी वाहनाने रामनगर परिसरात दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून पोलीस पथकाने बसस्टॉप ते रयतवारी कडे जाणाऱ्या मार्गावरील रेल्वे गेट जवळ नाकाबंदी लावुन संशयावरून एका रेनॉल्ट डस्टर वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये देशी दारूच्या ५५ पेटया किं. ५,५०,०००/—रू एक रेनॉल्ट डस्टर वाहन क्र. एमएच १४ डीएन ७५६९ किं. ९,००,०००/—रू आणि एक मोबाईल फोन किं. ५,०००/—रू असा एकुण किं. **१४,५५,०००/—रू** चा माल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ९६८/२०१९ अन्वये नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे **१)** संदिप रामा हेडाउ वय २९ वर्ष रा. धानला ता. मौदा जिल्हा नागपुर **२)** सौरभ राजु विधाते रा. बापटनगर चंद्रपुर यास अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोहवा. राजेंद्र खनके, कैलास खोब्रागडे, पोना. मिलींद चव्हाण, जमिर पठाण, चंदु नागरे, मनोज रामटेके, पोशि. प्रफुल मेश्राम, मयुर येरणे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7447744100 (PRO)


# दुकानात चोरी करणारा आरोपी चिमुर पोलीसांच्या जाळयात रोख रकमेसह ०३ मोबाईल हस्तगत

पोलीस स्टेशन चिमुर येथे काही दिवसापुर्वी एका कृषी केंद्रामध्ये आणि एका मोबाईलच्या दुकानात चोरी झाल्याबाबत कलम ४६१, ३८० भांदवि अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले होते. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान पोलीस पथकाने वेगवेगळया पदध्तीने तपास करण्यास सुरूवात केली. तपास सुरू असतांनाच पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की सदरच्या दोन्ही चोरी करणारा इसम हा चिमुर येथीलच रहिवासी आहे. यासंशयावरून आरोपी इसम नामे विकास विठोबा घरत वय ४० रा. बोरगाव ता. चिमुर यास ताब्यात घेवुन त्याची कसुन चौकशी केली असता, त्याने गुन्हयाची कबुली दिल्यावरून त्याला गुन्हयात अटक करून चोरी केलेले तीन मोबाईल किं. २१,०००/—रू आणि चोरीची रक्कम १२,०००/—रू असा एकुण ३३,०००/—रू चा मुदद्ेमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक आरोपीकडुन पोलीस स्टेशन चिमुर येथील दाखल असलेले दोन गून्हे अप.क्र. ३०२/१९ आणि २५९/१९ उघडकीस आले आहे. पुढिल तपास चिमुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात चिमुर पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. स्वप्नील धुळे, पोउपनि राजु गायकवाड, पोहवा. विलस निमगडे, नापोशि. किशोर बोढे, पोशि. सचिन गजभिये, विनायक सुरकुंडे, सचिन साठे, रोशन तामशेठवार, विजय उपरे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची जनावर तस्करीकरणाऱ्यांविरूध्द कार्यवाही

दिनांक २७/०७/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम कोस्टाळा ते लक्कडकोट मार्गे तेलंगाणा राज्यात अवैध रित्या जनावरांची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून लक्कडकोट मार्गावर सापळा रचुन संशयावरून तीन चारचाकी वाहनास थांबवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये अवैध रित्या कोंडुन असलेले एकुण १७ जनावरे मिळुन आले. यावरून तीन वाहन महिंद्रा बोलेरो क्र. **१)** एमएच ३४ एव्ही ०२६७, **२)** एमएच ३४ २१३१, **३)** एमएच ३४ ४५३५, जनावरे १७ आणि ६ **आरोपी नामे १) लोकेश राघोबा काळे रा. परसोडी, २) सत्यनारायण भिमया सोतकुल रा. लक्कडकोट, ३) भोलेनाथ लक्ष्मण गेडाम रा. कवडजई, ४) मंगेश तानाजी पोहाने रा. मानोरा, ५) गुरूदास गंगाराम मडावी, रा. कवडजई, ६) प्रविण मनोहर गुरलावार रा. कोठारी** यांना अटक करून एकुण **१०,५५,०००/—रू** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन विरूर येथे कलम ११(१)(ड) प्राणी संरक्षण कायदा १८९० सहकलम ४८,५०,५४ वन्यजिव सरंक्षण अधिनियम अन्वये नोंद करण्यात आला आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. प्रविन मानकर, गदादे, पोहवा. कैलास खोब्रागडे, धनराज खरकाडे, पोना. मनोज रामटेके, पोशि. प्रफुल मेश्राम, गोपाल आतकुलवार, अमोल धंदरे, रविंद्र पंधरे, प्रितम रामटेके यांनी पार पाडली.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
३१ जुलै, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7447744100 (PRO)

# पुराच्या पाण्यात अडकलेल्या ०७ इसमांची सुखरूप सुटका
# तळोधी पोलीसांची धाडसी कामगीरी

तिन ते चार दिवसापासुन संपुर्ण जिल्हयात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे लहान मोठे नदी, नाले, तळे तुडुंब भरून वाहत आहे. संततधार पावसामुळे जनजिवन विस्कळीत झाले होते. पोलीस विभाग सुध्दा पावसाळयात उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीपासुन बचाव करण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर सतर्क व सज्ज आहे.

दिनांक ३०/०७/२०१९ रोजी रात्रो २२/०० वाजता दरम्यान पोलीस स्टेशन तळोधी येथे एक माहिती मिळाली की, सतत सुरू असलेल्या पावसामुळे तळोधी या गावाला लागुन असलेला नाल्याला पावसामुळे पुर आला असुन ७ लोक शेतशिवारात अडकलेले आहे. अशी माहिती मिळताच तळोधी पोलीस स्टेशन प्रभारी सपोनि. श्री. शिरसाट हे आपल्या पोलीस पथकासह कोणताही विलंब न लावता तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळावर पोहचुन पाहणी केली असता चौहीकडे शेतशिवारातुन पाणी वाहत होते. सतत सुरू असलेला पाउस आणि रात्रीचा अंधार यापुढेही पोलीसांनी आपले बचाव कार्य सुरूच ठेवुन एनडीआरएफ चे पथकास बोलवुन त्यांचे मदतीने पुराच्या पाण्यात अडकलेले ७ इसम नामे १) वैजंतनाथ रामटेके रा. तळोधी, २) सुरेश दडमल रा. तळोधी, ३) रघुनाथ नरवास रा. तळोधी, ४) श्रीराम मोहुर्ले रा. लखमापुर, ५) जयराम गेडाम, रा. सावरगाव, ६) गजानन गेडाम रा. सावरगाव, ७) कवडु राउत रा. वलनी यांना सुखरूप बाहेर काढुन त्यांचे प्राण वाचविण्यात पोलीसांना यश आले आहे.

सदरचे बचावकार्य पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, तळोधी पोलीस स्टेशन प्रभारी सपोनि. श्री. शिरसाट, पोहवा. सतिश नेवारे, पोहवा. पठाण, पोहवा. गुप्ता, पोशि. निमगडे यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता महत्वाची भुमिका बजाविली आहे.

---